## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची शुक्रवार दि. १६/०१/२००९ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ११३ वी बैठक शुक्रवार दि. १६ जानेवारी २००९ रोजी सकाळी ११.०० वा. गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. आमदार श्री. सचिन अहिर | सभापती |
| २) | मा. श्री. तानाजी सत्रे, भा.प्र.से. | उप सभापती तथा मुख्य अधिकारी |
| ३) | मा.आमदार श्री.बशीर पटेल | सदस्य |
| ४) | मा. श्री. गजेंद्र लष्करी | सदस्य |
| ५) | मा. श्री. नंदकुमार काळे | सदस्य |
| ६) | मा. श्री. कमरुद्दीन मर्चंट | सदस्य |
| ७) | मा. श्री. किसन बा. जाधव | सदस्य |
| ८) | मा. श्री. तारीक फारुकी | सदस्य |
| ९) | मा. श्रीमती सुरेखा पाटील | सदस्या |
| १०) | मा.श्री.हेमराज शहा | सदस्य |
| ११) | मा.श्री.सईद खान | सदस्य |
| १२) | मा.श्री.हरिष सणस | सदस्य |
| १३) | मा.श्रीमती उल्का पाटकर | सदस्य |
| १४) | मा.श्री.सुबोध बांदिवडेकर | सदस्य |
| १५) | मा.श्री.व्ही.जी.नायर | सदस्य |
| १६) | मा.श्री.शरद शिरीषकर | सदस्य |
| १७) | मा. श्री. दिलीप शिंदे,उपसचिव,गृ.नि.विभाग | निमंत्रक |
| १८) | उपकर निर्धारक व संकलक, म.न.पा. | निमंत्रक |
| १९) | निवासी कार्यकारी अभियंता | सचिव |

बैठकीच्या सुरुवातीस मा.सभापती यांनी मकरसंक्रात निमित्त सर्व सन्मा.सदस्यांना शुभेच्छा दिल्या व मंडळाचे सचिव यांना बैठकीचे कामकाम सुरु करण्याच्या सूचना दिल्या. सचिव यांनी सर्व सन्मा.सदस्यांचे स्वागत करुन मंडळाची ११३ वी बैठक सुरु करीत असल्याचे जाहीर केले व मंडळाच्या दि.६ डिसेंबर २००८ रोजी झालेल्या ११२ व्या बैठकीचे कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी मंडळासमोर सादर केले.

**बाब क्रमांक : ११९/१ -**

विषय- दिनांक १६/१२/२००८ रोजी झालेल्या ११२ व्या बैठाकीचा कार्यवृतांत स्थायी करण्याबाबात.

---

सदर कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.१ ते ११ वर सादर करण्यात आले आहे.

मा. सदस्य श्री. सदस्य बशीर पटेल यांनी दुरुस्ती खर्चाची मर्यादा रु.१२०० वरुन रु.२०००/- करण्यात आल्यानंतर वाढीव रक्कम विचारात घेऊन दुरुस्तीची कामे करण्याचे ठरले होते. त्यानुसार त्यांच्या मतदारसंघातील कित्ती कामे सुरु झाली व कित्ती प्रलंबित आहेत याची माहिती त्यांना देण्यात आलेली नाही याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यांनी असेही निदर्शनास आणले की, त्यांच्या मतदारसंघात अनेक इमारती धोकादायक झालेल्या आहेत. जर त्या कोसळून काही अपघात झाला तर त्याची जबाबदारी कोणावर आहे. मंडळाचे संबंधित कार्यकारी अभियंता हे धोकादायक इमारतींच्या बाबतीत काय कार्यवाही करीत आहेत याची त्यांना माहिती देण्यात येत नाही तसेच बी. विभागातील मंडळाच्या कार्यालयातील अभियंत्यांची वारंवार बदली करण्यात येते. त्यामुळे कोण अभियंते कार्यरत आहेत हे देखील त्यांना समजून येत नाही. त्यांच्या मतदारसंघात सुमारे १४०० इमारती असून त्यासाठी केवळ दोन अभियंते कार्यरत आहेत. त्यामुळे हे दोन अभियंते कसे काय काम करणार अशी विचारणा करुन त्या कार्यालयातील अभियंत्यांची वारंवार बदली करण्यात येत असल्यामुळे त्याचा परिणाम कामावर होत आहे. त्या कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी वेळेवर हजर नसल्याबाबत त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

मा. सदस्य श्री. सदस्य बशीर पटेल यांनी असेही निदर्शनास आणले की, नागदेवी स्ट्रीट या इमारतीत अनधिकृतपणे वाढीव बांधकाम करण्यात आले व ती इमारत कोसळल्यानंतर त्याची म.न.पा.ने जबाबदारी मंडळाच्या अभियंत्यांवर टाकली.

यावर मा.सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, दुरुस्ती खर्चाची मर्यादा रु.१२०० वरुन रु.२०००/- करण्याचा निर्णय होणार हे गृहीत धरुन अंदाजपत्रके बनविण्याबाबत मा. मुख्य अधिकारी यांनी यापूर्वी सूचना दिल्या होत्या त्यानुसार बी. वॉर्डमधील अंदाजपत्रके बनविण्यात आली आहेत का अशी विचारणा केली. यावर उपमुख्य अभियंता (दक्षिण) यांनी माहिती दिली की, मागील दोन बैठकांमध्ये सादर करण्यात आलेल्या ७० अंदाजपत्रकांपैकी १८ अंदाजपत्रके बी. वॉर्डची असून ती अंदाजपत्रके रु.२०००/- च्या मर्यादेत असून त्यांना मंजूरी मिळालेली आहे मात्र ही माहिती मा. सदस्य श्री. बशीर पटेल यांना न दिल्यामुळे त्यांनी दिलगीरी व्यक्त केली.

मा. सदस्य श्री. बशीर पटेल यांनी असे निदर्शनास आणले की, शासनाकडून मिळालेल्या निधीमधून काही आमदारांच्या मतदारसंघातील कामे सुरु देखील झालेले आहेत मग त्यांच्या निधीमधून कामे का करण्यात येत नाहीत अशी विचारणा केली. यावर मा.सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, मा. सदस्य श्री. बशीर पटेल यांनी निदर्शनास आणलेल्या आमदारांच्या मतदारसंघातील कामे ही वेगळया यंत्रणेमार्फत्त सुरु करण्यात आली असतील व 'ब' विभागातील

जी कामे दुरुस्तीची वाढीव मर्यादा विचारात घेऊन हाती घेण्यात आली आहेत अशा कामांची यादी उपमुख्य अभियंता यांनी मा.सदस्य श्री. बशीर पटेल यांना त्वरित द्यावी अशा सूचना दिल्या व विशेष निधीतून करण्यात येणा-या कामांबाबत विचारणा केली असता उपमुख्य अभियंता (दक्षिण) यांनी माहिती दिली की, ४९ कामांपैकी १६ कामांना परवानगी देण्यात आली आहे व बाकीच्या कामाची अंदाजपत्रके आजच्या बैठकीत सादर करण्यात आली आहेत. अशाप्रकारे ३३ कामे त्वरित चालू करता येतील.

मा. सभापती यांनी मा.मुख्य अधिकारी यांना सूचना दिल्या की, आचारसंहिता लागण्याची शक्यता लक्षात घेता मंबई शहरातील सर्व आमदारांच्या विशेष निधी अंतर्गत करण्यात येणा-या कामांची अंदाजपत्रके बनवून ती पुढील बैठकीत प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात यावीत. गरज असल्यास या कामासाठी लागणारा कर्मचारीवर्ग तात्पुरत्या कालावधीकरिता इतर कार्यालयातून घेण्यात यावा. त्यांनी अशाही सूचना दिल्या की, ब.विभागात उपकरप्राप्त इमारतींची संख्या जास्त असून तेथे त्या भागातील लोक आता पुनर्विकास करण्यासाठी पुढे येत आहेत. काम खूप असल्यामुळे त्या कार्यालयात अधिकारी / कर्मचा-यांची संख्या वाढविली पाहिजे. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, निवड समितीची बैठक झाली असून या आठवडयात अधिकारी/कर्मचारी यांच्या नेमणुकीचे आदेश निघतील.

सचिव यांनी असे निदर्शनास आणले की, ठराव क्रमांक ११२/९३१ मध्ये सुधारणा असून बाब क्र.११२/२ च्या विषयामध्ये प्रचलित प्रमाणित मर्यादा रुपये २०००/- प्रति चौ.मी लागू करावयाच्या दक्षिण परिमंडळातील चार इमारतींची नावे दाखविण्यात आली आहे ती नावे नजरचुकीने ठरावामध्ये दाखविण्यात आलेली नाहीत. तरी १) इ.क्र.१०३-१०५ सारंग स्ट्रीट, २) इ.क्र.२४ कॉन्व्हेंट स्ट्रिट, ३) इ.क्र.५५ राजवाडकर स्ट्रिट कुलाबा, व ४) इ.क्र.२९अे-२९डी, एम के. रोड हया चार इमारती ठरावामध्ये अंतर्भूत आहेत असे वाचावे.

चर्चेअंती ११३ व्या बैठकीचे कार्यवृत्त सर्वानुमते स्थायी करण्यात आले.

---oo---

**बाब क्र.११३/२**

विषय- मंडळाच्या संक्रमण शिबीरात विविध संस्था लोकांच्या हिताची कामे करतात अशा सामाजिक संस्थांना शैक्षणिक कार्यासाठी संक्रमण शिबीरामधील गाळे वितरणासंबंधी धोरणात्मक निर्णय घेणेबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.१३ ते १७ वर सादर करण्यात आला आहे.

मा.सदस्य श्री.हेमराज शहा यांनी प्रस्तावात असे नमूद केले आहे की, एकलव्य शिक्षण संस्थेच्या बाबतीत मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी आदेश दिले असे नमूद केले आहे. प्राधिकरणाच्या बैठकीनुसार झालेला ठराव मानवयाचा की, मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांचे आदेश मानावयाचे अशी त्यांनी विचारणा केली. यावर मा. सभापती यांनी प्राधिकरणावर अशासकीय सदस्यांची नेमणुक झालेली नसली तरी प्राधिकरण अस्तित्वात आहे. त्यामुळे मंडळासमोर सादर करण्यात आलेल्या प्रस्तावात स्पष्टपणे प्राधिकरणाचा ठराव नमूद करण्यात यावा अशा सूचना दिल्या.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी असे निदर्शनास आणले की, सन २००५ मध्ये गाळे वाटपाचा प्राधिकरणाचा निर्णय झालेला असताना सादर करण्यात आलेल्या प्रस्तावात ' सन २००३ नंतर मंडळाचे सभापती व सदस्यांची नियुक्ती शासनाकडून न झाल्याने कोणत्याही संस्थेस शालेय कामासाठी संक्रमण शिबीरातील गाळे वाटप करण्यात आलेले नाहीत ' असे जे नमूद केले आहे ते चुकीचे आहे.

मा. मुख्य अधिकारी यांनी असे निदर्शनास आले की, संक्रमण गाळे हे उपकरप्राप्त इमारतीतील रहिवाशांसाठी बांधलेले असल्यामुळे त्या गाळयाचे वाटप उपकरप्राप्त इमारतीतील रहिवाशांना करणे अपेक्षित असते. परंतु यापूर्वी ४-५ शैक्षणिक संस्थांना संक्रमण गाळयांचे वाटप करण्यात आले आहे. परंतु काही शैक्षणिक संस्थांना गाळे देता येणार नाहीत असे कळविल्यामुळे ते मा. उच्च न्यायालयात गेले. मा. उच्च न्यायालयाने मंडळाने याबाबत योग्य निर्णय घ्यावा असे मंडळास आदेश दिले आहेत म्हणून शैक्षणिक संस्थाना गाळे वाटप करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक असल्यामुळे सदर विषयावर चर्चा व्हावी अशी सूचना केली व चर्चेमध्ये जो निर्णय घेण्यात येईल तो प्राधिकरणाकडे पाठविण्यात येईल. मा. सदस्य श्री शहा व मा. सदस्य श्री. जाधव यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांची तपासणी करुन माहिती देण्यात येईल असे सांगितले.

मा. सभापती यांनी अशी सूचना केली की, संक्रमण शिबीरात लोकांसाठी आवश्यक सुविधा उदा. रेशनिंग दुकान, शाळा, दवाखाने नसतात म्हणून आता जी नवीन संक्रमण शिबीरे बांधण्यात येणार आहेत तेथे अशा सुविधा उपलब्ध होण्यासाठी काही संक्रमण गाळे आरक्षित ठेवणे आवश्यक आहे. समजोपयोगी काम करणा-या कोणत्या संस्थांसाठी किती गाळे आरक्षित ठेवायचे, कोणते निकष निश्चित करावयाचे याबाबत धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल. धोरणात्मक निर्णय झाल्यानंतर अशा राखीव गाळयांसाठी सामाजिक संस्थांकडून अर्ज प्राप्त झाल्यावर जे अर्ज निकषांच्या आधारे पात्र ठरतील त्यांना गाळे देता येतील. काही संक्रमण

शिबीरात कदाचित अशा गाळयांसाठी मागणी येणारही नाही हा दृष्टीकोनही धोरण ठरविताना विचारात घेणे आवश्यक आहे.

सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाच्या प्रारुप ठरावाबाबत मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी अशी सूचना केली की, शैक्षणिक व सामाजिक कार्य करणा-या संक्रमण शिबीरातील संस्थांना त्यांच्या कार्यासाठी गाळे देण्यात यावेत. व अशा संस्थांसाठी कमीत कमी २% गाळे आरक्षित ठेवण्यात यावेत व मासिक आकारणी त्या त्या विभागात ज्या दराने करण्यात येते त्या दराने करण्यात यावी व निकष ठरवूनच संस्थांना गाळे देण्यात यावेत. यावर मा.सभापती यांनी अशी सूचना केली की, सादर करण्यात आलेला प्रस्ताव परिपूर्ण नसल्यामुळे आजच्या बैठकीत तो मंजूर न करता निकष ठरवण्यासाठी उपसमिती स्थापन करण्यात यावी. त्या समितीमध्ये २-३ मा.सदस्य व अधिकारी यांचा समावेश असावा. व या समितीने न्यायालयाच्या आदेशांच्या आधारे धोरणात्मक निर्णयासाठी प्रस्ताव द्यावा.

मा. सदस्य श्री. लष्करी यांनी अशी माहिती दिली की, कुलाबा संक्रमण शिबीरात डोअर स्टेप स्कूल ...........नावाची एक संस्था शैक्षणिक कार्य करीत असून ती चालवित असलेल्या शाळेत आजपर्यंत अनेक गरीब व सर्व जाती जमातीची मुले विनामुल्य शिकत आहेत. सदर संस्थेने मंडळाकडे अर्ज करुन गाळयांची मागणी केलेली आहे व त्यांची मागणी मंडळाने मान्य केली असून संस्थेस संक्रमण गाळे वाटप करण्यासाठी म्हाडाकडून एक करारपत्र देण्यात आले होते. सदर संस्था करीत असलेले कार्य लक्षात घेऊन त्या संस्थेस गाळे वितरीत करण्यात यावेत .

मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी सुरुवातीपासून हा मुद्दा मांडला असून ते सदर शैक्षणिक संस्थेस रितसर गाळे वितरीत करण्यासाठी पाठपुरावा करीत आहेत. परंतु अबू आझमी यांच्या आझमी चरिटेबल ट्रस्टने इतर संस्थांना गाळे दिले व त्यांच्या संस्थेस गाळे दिले नाहीत म्हणून मुंबई उच्च न्यायालयात दावा दाखल केला आहे. न्यायालयात मंडळातर्फे ज्या संस्थांना गाळे देण्यात आले आहेत ते गाळे रितसर देण्यात आलेले आहेत अशी बाजू मांडण्यात आली आहे व न्यायालयाने मंडळास सामाजिक संस्थांना गाळे वाटप करण्यासाठी धोरण ठरवण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार जी उपसमिती स्थापन करण्यात येणार आहे त्या समितीने धोरण ठरवून मंडळासमोर सादर करावे व चर्चा करुन ते धोरण निश्चित करण्यात यावे अशी सूचना केली.

मा. मुख्य अधिकारी यांनी सूचना केली की, मा. श्री. गजेंद्र लष्करी व आणखी एक इच्छुक मा.सदस्य यांनी व उपमुख्य अधिकारी (सं.गा.) यांनी एकत्र बसून नेमका प्रस्ताव द्यावा जेणेकरुन मंडळास धोरण निश्चित करणे शक्य होईल व तदनंतर त्याची माहिती न्यायालयास सादर करता येईल.

**बाब क्र.११३/३**

विषय- मुंबई बेटावरील अ.वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पूनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.

---

१ भुकर पाहाणी क्र.१४६३ भायखळा विभाग "नुरजहां मेन्शन" व "युनायटेड मेन्शन"
२ भुकर पाहाणी क्र.१८५६ आणी १८५७ भायखळा विभाग "कोयटा हाऊस " आणी " युसुफी बाग "
३ भुकर पाहाणी क्र.२३ई/१०, प्लॉट क्र.७२०-ए माटुंगा विभाग "सोहनाज बिल्डींग "
४ भुकर पाहाणी क्र.९३१ गिरगाव उपकर क्र.डी-२२० ४३, " अन्सारी मंझील "
५ भुकर पाहाणी क्र.१५८८ माहीम विभाग " ग्रेगरी हाऊस "
६ भुकर पाहाणी क्र.१/१२७७ माहीम विभाग " तांबवेकर निवास "

सचिव यांनी उपरोक्त.०६ पुनर्विकासाच्या विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) च्या प्रस्तावांबद्दल मंडळाच्या सदस्यांना थोडक्यात माहिती दिली.

सविस्तर चर्चेअंती मंजूरीसाठी सादर करण्यात आलेल्या ना.ह.प्र.प्रदान करण्याच्या प्रस्तावांना सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक : ११३/९४०**

मुंबई बेटावरील खालील ०६ मालमत्तांवरील 'अ' वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्ताव प्रस्तावांत नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या आधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी.

---oo---

१ भुकर पाहाणी क्र.१४६३ भायखळा विभाग "नुरजहां मेन्शन" व "युनायटेड मेन्शन"
२ भुकर पाहाणी क्र.१८५६ आणी १८५७ भायखळा विभाग "कोयटा हाऊस " आणी " युसुफी बाग "
३ भुकर पाहाणी क्र.२३ई/१०, प्लॉट क्र.७२०-ए माटुंगा विभाग "सोहनाज बिल्डींग "
४ भुकर पाहाणी क्र.९३१ गिरगाव उपकर क्र.डी-२२० ४३, " अन्सारी मंझील "
५ भुकर पाहाणी क्र.१५८८ माहीम विभाग " ग्रेगरी हाऊस "
६ भुकर पाहाणी क्र.१/१२७७ माहीम विभाग " तांबवेकर निवास "

---oo---

**<u>बाब क्रमांक ११३.४</u> ( उत्तर परिमंडळ )**

विषय- अ) उत्तर परीमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

१) इ.क्र.३५६ राज निकेतन या इमारतीच्या दुरुस्तीच्या कामात झालेल्या वाढीव खर्चास मंजुरी मिळणेबाबत.

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. ४५ ते ६५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

मा. सदस्य श्री.जाधव यांनी अशी विचारणा केली की, आता सर्वांना सरसकट रु.२०००/- च्या मर्यादेमध्ये काम करण्यास परवानगी देण्यात येणार आहे का ? व जी कामे मागे झाली आहेत त्या कामांना देखील परवानगी देण्यात येणार आहे का ? यावर मा.सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, रु.१२०० ची मर्यादा ओलांडल्यानंतर रु.२०००/- च्या मर्यादेमधील ज्यांचे ज्यांचे प्रस्ताव असतील त्या कामांना परवानगी देण्यात येईल. जी कामे पूर्वीच्या मंजूरीनुसार झाली आहेत त्यांना पुन्हा मंजूरी देण्याचा प्रश्न नाही. ती पूर्वीच्या मंजूरीनुसारच करण्यात येणार आहेत. यावर मा. सदस्य श्री. जाधव यांनी असे निदर्शनास आणले की, सन २००६ मध्ये प्रशासकीय मंजूरी घेतली आहे व काम पूर्ण झाले आहे त्या कामांचे पैसेही रु.२०००/- प्रमाणे देण्यात येणार का ? तसेच पृ.क्र.८७ वर इ.क्र.२३-२५,जंजीकर स्ट्रीट या इमारतीचे प्रकरणही वरील इमारतीप्रमाणेच आहे असे निदर्शनास आणले. चर्चेअंती मा. मुख्य अधिकारी यांनी सदर दोन्ही प्रकरणे तपासून निर्णय घ्यावा तोपर्यंत ती प्रलंबित ठेवावी अशी सूचना मा. सभापती यांनी केली. त्यावर मा. सदस्यांनी मांडलेले मुद्दे विचारात घेऊन दोन्ही प्रकरणांत निर्णय घेण्यात येईल असे मा. मुख्य अधिकारी यांनी सांगितले.

चर्चेअंती उत्तर परीमंडळातील १०३ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.१७,८०,६३,७१९ /- व निव्वळ रक्कम रु.९,५६,३७,१७३./- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक ११३/९४१**

उत्तर परीमंडळातील एकूण १०३ उपकरप्राप्त इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांचे मुळ/ सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक ११३.४ (दक्षिण परिमंडळ)**

विषय- दक्षिण परीमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

१) इ.क्र.२३-२५ जंजीकर स्ट्रीट या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीबाबत

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. ६९ ते ८५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती दक्षिण परीमंडळातील ३८ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी एकूण रक्कम रु. ६,५०,७४,४४५/- व निव्वळ टप्प्याची रक्कम रु. ३,९५,४५,६७५/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक १११/ ९४२**

दक्षिण परीमंडळातील ३८ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामाचे नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या यादीनुसार प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

## मा.अध्यक्षांच्या मान्यतेने आयत्यावेळी ठेवावयाचे विषय

**बाब क्रमांक ११३.६ (पुनर्विकास)**

विषय- मुंबई बेटावरील अ वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पूनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.

--------------------------------------------

१ भुकर पाहाणी क्र.८४९, ८५० आणी ८५१ माझगाव विभाग अहमद बिल्डींग

२ भुकर पाहाणी क्र.७९३ गिरगाव विभाग हवालदार बिल्डींग

३ भुकर पाहाणी क्र.८२६ गिरगाव विभाग अरब बिल्डींग

४ भुकर पाहाणी क्र.२०९० आणी २०९१ भायखळा विभाग मोहम्मद बक्स बिल्डींग

५ भुकर पाहाणी क्र.२९५ /१० प्लॉट क्र.३९७ माटुंगा विभाग पटेल हाऊस

६ भुकर नहाणी क्र.१/६४३ माझगाव विभाग मालिक हाऊस

७ भुकर पाहाणी क्र.१८१९ मांडवी विभाग इ.क्र.४३-४५ जेलरोड

८ भुकर पाहाणी क्र.१८०४ मांडवी विभाग इ.क्र.५ डोंगरी क्रॉस लेन पारसी बिल्डींग

९ भुकर पाहाणी क्र.३८६/१० माटुंगा दिलीप बिल्डींग

१० भुकर पाहाणी व्र२२,२३, २५,४९ आणी ५० भायखळा विभाग

११ भुकर पाहाणी १४१४ आणी १४१५ झकेरीया मस्जीद

आयत्यावेळच्या विषयांमध्ये उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.१ ते ४३.वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सचिव यांनी उपरोक्त.११ पुनर्विकासाच्या विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) च्या प्रस्तावांबद्दल मंडळाच्या सदस्यांना थोडक्यात माहिती दिली.

सविस्तर चर्चेअंती मंजूरीसाठी सादर करण्यात आलेल्या ना.ह.प्र.प्रदान करण्याच्या प्रस्तावांना सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक : ११३/९४३**

मुंबई बेटावरील खालील ११ मालमत्तांवरील 'अ' वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्ताव प्रस्तावांत नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या आधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी.

१ भुकर पाहाणी क्र.८४९, ८५० आणी ८५१ माझगाव विभाग अहमद बिल्डींग

२ भुकर पाहाणी क्र.७९३ गिरगाव विभाग हवालदार बिल्डींग

३ भुकर पाहाणी क्र.८२६ गिरगाव विभाग अरब बिल्डींग

४ भुकर पाहाणी क्र.२०९० आणी २०९१ भायखळा विभाग मोहम्मद बक्स बिल्डींग

५ भुकर पाहाणी क्र.२९५ /१० प्लॉट क्र.३९७ माटुंगा विभाग पटेल हाऊस

६ भुकर नहाणी क्र.१/६४३ माझगाव विभाग मालिक हाऊस

७ भुकर पाहाणी क्र.१८१९ मांडवी विभाग इ.क्र.४३-४५ जेलरोड

८ भुकर पाहाणी क्र.१८०४ मांडवी विभाग इ.क्र.५ डोंगरी क्रॉस लेन पारसी बिल्डींग

९ भुकर पाहाणी क्र.३८६/१० माटुंगा दिलीप बिल्डींग

१० भुकर पाहाणी व्र२२,२३, २५,४९ आणी ५० भायखळा विभाग

११ भुकर पाहाणी १४१४ आणी १४१५ झकेरीया मस्जीद

---

**बाब क्रमांक ११३.७**

विषय- १) विशेष निधी अंतर्गत मा.आमदार श्री.बशीर मुसा पटेल यांच्या मतदार संघात करावयाच्या कामांच्या प्रस्तावांना प्रशासकिय मान्यता देणेबाबत.

१) विशेष निधी अंतर्गत मा.आमदार श्री.दगडु सकपाळ यांच्या मतदार संघात करावयाच्या कामांच्या प्रस्तावांना प्रशासकिय मान्यता देणेबाबत.

२) विशेष निधी अंतर्गत मा.आमदार श्री.कालीदास कोळंबकर यांच्या मतदार संघात करावयाच्या कामांच्या प्रस्तावांना प्रशासकिय मान्यता देणेबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.४५ ते .६५.वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

मा. सभापती यांनी अशी सूचना केली की, विशेष निधीमधून कामे करण्याबाबत ज्या सन्मा.आमदारांची पत्रे प्राप्त झाली आहेत त्याबाबत सर्व संबंधित मा. आमदारांना कळविण्यात यावे व विशेष निधी अंतर्गत करावयाच्या कामांची अंदाजपत्रके पुढील बैठकीत सादर करण्यात यावीत.

सविस्तर चर्चेअंती विशेष निधी अंतर्गत मा. आमदारांच्या मतदारसंघात करावयाच्या कामाच्या प्रस्तावांना परिशिष्ट-ब नुसार मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तात स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी देण्याचे ठरले.

**<u>ठराव क्रमांक ११३/९४४</u>**

विशेष निधी अंतर्गत मा. आमदारांच्या मतदारसंघात करावयाच्या कामाच्या प्रस्तावांना परिशिष्ट-ब नुसार मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तात स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी देण्यात आली.

---

**<u>बाब क्रमांक ११३/८</u>**

विषय- मुंबई बेट शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकप्राप्त इमारतींचे सर्व्हेक्षण करुन संगणीकृत माहीती तयार करण्यासाठी बोलावण्यात आलेल्या निविदांबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. ६७ ते ८३ वर सादर करण्यात आले आहेत.

मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, मंडळातर्फे वि.नि.नि.कलम ३३ (६), ३३ (७), ३३ (९), व ३२ अंतर्गत जून्या उपकरप्राप्त इमारतींची पुनर्बांधणी करण्यात येत असते. पुनर्विकासाचे प्रस्ताव सादर करण्यासाठी संबंधित संस्थेचे विकासक व वास्तुशास्त्रज्ञ यांना माहिती गोळा करण्याचे काम करावे लागते. माहिती गोळा करण्याचे काम अतिशिय जिकीरीचे असते. उदा. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मालकी हक्काबाबतची माहिती घेणे, मालकी हक्क कोणाच्या नावे आहे, कोठे राहतात, भूखंड/सदनिकेचे क्षेत्रफळ किती आहे तसेच म.न.पा.कडून इमारत उपकरप्राप्त आहे का ? आरक्षण आहे का ? आजूबाजूच्या इमारती बाधित आहेत का ? मंडळाने त्या इमारतींची पूर्वी दुरुस्ती केली आहे का ? केली असल्यास किती खर्च करण्यात आला आहे ? इमारतीचे भाडेकरु/रहिवाशी कोण होते/आहेत ? पुनर्विकास केल्यास किती च.क्षे.नि. मिळेल ? अशाप्रकारे एका इमारतीची माहिती गोळा करण्यासाठी साधारणतः ६ ते ८ महिने किंवा कधी कधी वर्षसुध्दा लागते. अशी माहिती गोळा केल्यानंतर संबंधित विकासक किवा मालक यांचेशी संपर्क साधून त्यांची संमती मिळविण्याचे काम करावे लागते. मालक / विकासक संमती देतील याची खात्री नसते. त्यामुळे माहिती गोळा करण्यामध्ये केलेली मेहनत वाया जाण्याची शक्यता असते. त्यामुळे पुनर्विकासाच्या वेगाला चालना मिळत नाही. जास्तीतजास्त उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास करणे हा मंडळाचा मुख्य हेतू आहे त्याकरिता खाजगी विकासकांना सामावून घेण्यात येत असते. जून्या उपकरप्राप्त इमारतींची संख्या पाहिली तर मंडळाकडून त्या इमारतींची पुनर्रचना होणे अशक्य वाटते. कारण भूसंपादनासाठी लागणारा वेळ, रहिवाशांना संक्रमण शिबीरात स्थलांतरित करणे, इमारतीचे काम सुरु करणे इ. प्रक्रिया

विचारात घेतल्या तर पुनर्रचनेचे काम मंडळाच्या आवाक्याबाहेरचे आहे. म्हणूनच पुनर्विकास योजना आली आहे. पुनर्विकास योजना मोठया प्रमाणात राबवावयाची असेल तर त्यामध्ये येणा-या अडचणींवर मात करणे आवश्यक आहे. मा. मुख्य अधिकारी यांनी अशीही माहिती दिली की, शासनातर्फे विकास नियंत्रण नियमातील कलम ३३ (९) मध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित असून या सुधारणेनुसार क्लस्टर डेव्हलपमेंट करण्यात येणार आहे. क्लस्टर डेव्हलपमेंटच्या माध्यमातून मोठय प्रमाणात पुनर्विकास व्हावा अशी अपेक्षा आहे. जर मंडळाकडे इमारतीबाबतची आवश्यक माहितीच उपलब्ध नसेल तर कितीही चांगली योजना घोषित केली तरी त्याचा परिणाम दिसण्यास वेळ लागेल. नवीन योजनेसाठी लागणारी पूरक माहिती कशाप्रकारे उपलब्ध होईल याचा मागील ७-८ महिन्यांपासून विचार करण्यात येत होता. त्या अनुषंगाने एक संगणक प्रणाली विकसित करण्यात आली असून त्या संगणक प्रणालीच्या आधारे शहरातील पुनर्विकसित झालेल्या व तसेच अद्याप अस्तित्वात असलेल्या अशा सर्व १९६४२ इमारतींची माहिती संकलित करावयाची अणि ती संगणकावर घ्यावयाची जेणेकरुन त्या इमारतीचा पुनर्विकास करण्याचा निर्णय घेण्याच्यादृष्टीने सर्व माहिती उपलब्ध असेल या योजनेच्या अनुषंगाने माहिती गोळा करण्यासाठी खाजगी संस्था किंवा खाजगी व्यक्तींची निवड करण्यासाठी टाटा कन्सल्टन्सी यांच्याकडून टेंडर तयार करुन घेण्यात आले होते. या कामासाठी निवृत्त अधिका-याना विशेष कार्य अधिकारी म्हणून नेमून त्यांची मदत घेण्यात आली आहे. या कामाची निविदा काढण्यात आली असून अंदाजित खर्च रु.५ कोटीपेक्षा जास्त असल्यामुळे मान्यतेसाठी प्राधिकरणाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. प्राधिकरणाने हा प्रस्ताव मान्य करुन तो लवकरात लवकर अंमलात आणावा अशा सूचना दिल्या आहेत. त्यादृष्टीने उपकरप्राप्त इमारतीची माहिती गोळा करण्याचा प्रकल्व हाती घेण्यात आला आहे.

मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी मा. मुख्य अधिकारी यांनी उपकरप्राप्त इमारतीचा पुनर्विकासासाठी सादर केलेला प्रस्ताव प्रशंसनीय आहे असे मत व्यक्त केले व उपकरप्राप्त इमारतीबाबतची माहिती कोणताही नागरिक केव्हाही व कोठेही परदेशात असला तरी तो संगणकावर पाहू शकतो. त्यांनी अशी विचारणा केली की, या प्रकल्पासाठी लागणारे रु.५ कोटी प्राधिकरण मंडळास अनुदान म्हणून देत आहे की, कर्ज देत आहे की मदत देत आहे ? त्यांनी पुढे अशी सूचना केली की, अशाप्रकारची सेवा मंडळ उपलब्ध करुन देणार असल्याबद्दल जो खर्च येणार आहे त्याचा बोजा मंडळावर येऊ नये म्हणून जो कोणी विकासक कलम ३३(७), ३३(९) खाली किंवा क्लस्टर डेव्हलपमेंट खाली पुनर्विकास करण्यासाठी पुढे येईल त्यांच्याकडून काही शुल्क घेण्यात यावे.

मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांच्या मताशी सहमती दर्शवून मा. सदस्य श्री.किसन जधव यांनी असे मत व्यक्त केले की, एकेका इमारतीची माहिती गोळा करुन प्रस्ताव सादर

करण्यासाठी साधारणतः वर्ष लागते. हा जो प्रकल्प हाती घेण्यात येत आहे त्याचा फायदा प्रत्येकाला म्हणजे मंडळाला, विकासकाला, रहिवाशी/भाडेकरु यांना होणार आहे. त्यामुळे त्यांच्याकडून काही शुल्क आकारण्यास हरकत नाही. त्यांनी पुढे अशी सूचना केली की, उपकरप्राप्त इमारतींबरोबरच संक्रमण शिबीरांच्या बाबतीतही अशा प्रकारचा प्रकल्प तयार केला पाहिजे. संक्रमण शिबीरामध्ये जे भाडेकरु आहेत त्यांचा पूर्व इतिहास काय आहे ? तो कोठून आला ? त्याची जूनी इमारत अस्तित्वात आहे की,नाही ? तो खरा भाडेकरु आहे की नाही ? घुसखोर आहे का ? ही सर्व माहिती घेण्याचे काम युध्दपातळीवर करण्यात आले होते. ते काम अशाप्रकारे झाले तर घुसखोरीला आळा घालता येईल.

मा. मुख्य अधिकारी यांनी सदर प्रकल्पासाठी होणारा खर्च भागविण्यासाठी प्राधिकरणाकडून अनुदानातून मिळणार नसून मंडळाकडे उपलब्ध असलेल्या अनुदानातूनच हा खर्च करावा लागणार आहे. उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास जलदगतीने होणे हा मंडळाचा हेतू असल्यामुळे व मंडळ हे मदतनीस (फॅसिलेटर) म्हणून काम करीत असल्यामुळे विकासकास यामधून माहिती देऊन मंडळास काही निधी उपलब्ध होऊ शकतो का ? यावर विचार चालू आहे. सदर उपलब्ध माहितीमधील काही माहिती विकासकास उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकासाचा प्रस्ताव तयार करताना लागणार असल्यामुळे सदर माहिती मंडळाकडून विकत घेण्याबाबत त्यांना अट घालण्याचे विचाराधीन असून त्यामधून काही खर्च वसुल होऊ शकतो.तसेच प्राधिकरणाच्या निर्देशानुसार किमान गिरण्यांच्या जमिनीवरील इमारतींची माहिती जमा करण्याचेही काम घेण्यात येत आहे असे सांगितले तसेच संक्रमण शिबीराच्या प्रकल्पाच्या बाबतीतही विचार चालू असून एक दोन महिन्यांत आपल्यापुढे असा प्रकल्प आणता येईल. सदर बाब प्राधिकरणापुढे नेण्यात आली असून प्राधिकरणाने सदर प्रस्तावाची प्रशंसा करुन सदर खर्च करण्यास मंजूरी दिलेली आहे असे नमूद केले.

मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, सदर माहिती गोळा करण्याचे काम टप्प्याटप्प्याने वॉर्डनिहाय करण्याबाबत व जमा केलेली सॉफ्टवेअरवरची माहिती खाजगी ठिकणी गेल्यास ती माहिती सर्व ठिकाणी उघड होऊन आपला उद्देश सफल होणार नाही. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी मंडळाने या माहितीकरिता स्वतंत्र सॉफ्टवेअर विकसित केले असून त्यासाठी आवश्यक ती सेक्युरिटी घेण्यात येत आहे. सदर माहिती अन्य कोणास वापरता येणार नाही याची दक्षता घेण्यात येत तसेच सदर माहिती ही म.न.पा., जिल्हाधिकारी कार्यालय व प्रत्यक्ष इमारतीतील भाडेकरुंशी संवाद करुन तयार करावयाची आहे. त्या माहितीमध्ये इमारतीचा नकाशा, इमारतीची सद्यस्थिती, इमारतीच्या आजूबाजूच्या भूखंडाचे आरक्षण, भूसंपादन झालेल्या इमारती इ. माहिती गोळा होणार आहे. सदर माहिती मंडळाच्या अभियंत्यांमार्फत जमा करणे शक्य नसल्याने व ठराविक कालावधीत माहिती गोळा करावयाची असल्यामुळे सदर

माहिती निविदा मागवून गोळा करण्याचे प्रस्तावित केले आहे. माहिती गोळा करण्यासाठी प्रति रहिवाशी याप्रमाणे दर मागविण्यात आले होते व सदर दर रु.१०० ते रु.१३० या दरम्याने आले आहेत. निविदा स्विकृतीचा प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठविण्यात आला व प्राधिकरणाने तो मंजूर केला आहे. संकलित केलेली माहिती फक्त मंडळाकडेच उपलब्ध राहील व निविदाकारास टप्प्याटप्प्याने कामानुसार पेमेंट केले जाणार आहे. यावर मा. सभापती यांनी याप्रमाणे एक संक्रमण शिबीराचा प्रकल्प प्रायोगिक तत्वावर घेण्याची सूचना केली व मा. मुख्य अधिकारी यांनी हाती घेतलेले काम योग्यच असल्याचे नमूद केले.

## <u>आयत्यावेळचे विषय</u>

मा.सभापती यांनी सूचना केली की, ३३ (७), ३३ (९) बाबतीत काहीही निर्णय होत नाही. विधानसभेमध्ये ३३ (७) बाबतीत वादंग निर्माण झाला होता. ३३ (७) ला प्रोत्साहन देण्याची गरज असून २८ तारखेला नगर विकास विभागाकडून अधिसूचना आलेली आहे. त्या सूचनेस स्थगिती दिली होती व त्याबाबतीत मा. मुख्यमंत्री १५ दिवसात बैठक लावणार होते. सदर योजनेस प्रोत्साहन देण्याकरिता गाळयाचे क्षेत्रफळ ३०० चौ.फू. करण्याची मागणी होती. परंतु त्याच धर्तीवर ०.५ च.क्षेनि. वाढविणे आवश्यक होते. परंतु तो वाढविण्यात आलेला नाही. त्यामुळे अनेक प्लॉटवर ही योजना शक्य होऊ शकत नाही. तसेच विकासकाला रु.७०००/- प्रति चौ.मी. प्रमाणे इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट चार्जेस द्यावे लागणार आहेत. तरी अंतीम अधिसूचना प्रसिध्द झाली किंवा कसे व तिची सद्यस्थिती काय आहे? याबाबत मा. मुख्य अधिकारी यांनी मा. श्री. बेंजामिन साहेब यांचेबरोबर विषय घेऊन आमच्या भावना त्यांच्यापर्यत पोहोचवाव्यात. तसेच ३३ (९) बाबतीत लोकांकडून विचारणा होत आहे की ३३ (९) का होत नाही ? २२५ चौ.फू. ऐवजी ३०० चौ.फू. गाळयाचे क्षेत्रफळ होणार असल्यामुळे काही विकासकांनी त्यांचे प्रकल्प थांबविले आहेत. परंतु भाडेकरुंना विकासकास भाडे द्यावे लागते. काही प्रकल्पांमध्ये विकासकांनी भाडेकरुंची पर्यायी व्यवस्था भाडयाने केलेली असते व अशा परिस्थितीत प्रकल्प एका वर्षापेक्षा जास्त लांबल्यास विकासकास प्रकल्प राबविणे अशक्य होते विकासकाने कुठल्या चटई क्षेत्रफळांचे गाळे प्रस्तावित करुन नकाशे मंजूर करावेत याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे व अशा प्रकरणी लवकरात लवकर निर्णय होणे आवश्यक आहे.

मा. सभापती यांनी पानवाला चाळीच्या प्रस्तावाबाबत काही भाडेकरुंनी तक्रार केली असून त्याबाबतची वस्तुस्थिती तपासून घ्यावी व तोपर्यंत सदर नाहरकत प्रमाणपत्रास स्थगिती देण्यात यावी अशा सूचना निवासी कार्यकारी अभियंता यांना दिल्या.

मा. सभापती यांनी सहमुख्य अधिकारी यांना सूचना दिल्या की, मंडळाकडे उपलब्ध असलेल्या व वेगळया ठिकाणी विखुरलेल्या १२० चौ.फू. ते १८० चौ.फू. सदनिकांची विक्री करण्याचा प्रस्तावाबाबत माहिती द्यावी. त्यावर सहमुख्य अधिकारी यांनी माहिती दिली. परंतु सदर प्रस्तावाच्या प्रती सन्मा. सदस्यांना दिल्या नसल्यामुळे मा. सभापती यांनी सदनिकांच्या विक्रीकरिता पात्रतेचे नियम व वाटपाचे निकष, आकारण्यात येणारे दर इ.बाबी ठरविण्याबाबत मा. सदस्य श्री.किसन जाधव व अन्य इच्छुक सदस्यांची समिती स्थापन करुन सदर समितीने पुढील बैठकीत परिपूर्ण प्रस्ताव सादर करावा असे सुचविले.

मा. सदस्य श्रीमती. पाटकर यांनी बोटावाला चाळीबाबत विषय मांडला व असे निदर्शनास आणले की, या चाळीचा पुनर्विकास मंडळाने करावयाचा कि खाजगी विकासकाने करावयाचा याचा निर्णय होत नसल्यामुळे भाडेकरु संभ्रमात आहेत व सन २००५ पासून प्रकल्प रखडल्याबाबत नाराजी व्यक्त केली. व इमारतीची पुनर्बांधणी लवकर घेण्याबाबत विनंती केली. त्यावर मा. सभापती यांनी असे सुचविले की,भाडेकरुंचे म्हणणे रेकॉर्डवर घेऊन पुढच्या बैठकीत ८८ (३)(अ) चा प्रस्ताव आणावा.

मा. सदस्य. श्री. किसन जाधव यांनी काही भाडेकरु १९७१ पासून संक्रमण शिबीरात रहात असूनही त्यांची नावे मास्टर लीस्टवर घेतलेली नाहीत. मास्टर लीस्टवर नाव घेण्याकरिता जी सुनावणी घेण्यात येते तिची प्रोसीजर खूप वेळ घेणारी आहे व भाडेकरुस वारंवार चकरा माराव्या लागतात. तरी मास्टर लीस्ट तयार आहे का ? अशी विचारणा केली. त्यावर सहमुख्य अधिकारी यांनी असा खुलासा केला की, मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या दाव्याच्या अनुषंगाने दिलेल्या माहितीनुसार मास्टर लीस्टवर नांवे घेण्यासाठी ९०९ अर्ज प्रलंबित असून दर मंगळवार व शुक्रवारी बैठक घेऊन निर्णय घेण्यात येत आहेत तसेच सदर काम मा. उच्च न्यायालयाच्या सूचनेनुसार विहित कालावधीत पूर्ण करण्यात येईल.

मा. सदस्य श्रीमती सुरेखा पाटील यांनी प्रभादेवी येथील वाकडी चाळ ही इमारत धोकादायक असून तिच्या पुनर्विकासाबाबत निर्णय लवकर घेण्याबाबत विनंती केली.

मा. सदस्य. श्री. किसन जाधव यांनी असे निदर्शनास आणले की, चिखलवाडी येथे व इतर विभागातील अनेक इमारतींमध्ये अनेक महिन्यांपासून भाडे वसुली करण्यात आलेली नाही. कर्मचारी कमी असल्यामुळे भाडेकरुंना जवळपासच्या राष्ट्रीयकृत बँकेत भाडे भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत त्यांनी मागे सूचना केली होती.त्याबाबत काय झाले अशी विचारणा केली. यावर उपमुख्य अधिकारी (पु.गा.) यांनी माहिती दिली की, सुमारे ५५ इमारतींमध्ये असा प्रश्न निर्माण झाला होता. उपलब्ध भाडेवसुलीकारांना अतिरिक्त कार्यभाराचे आदेश देण्यात आले असून सोमवारपासून नियमित भाडेवसुलीकार भाडे घेण्यास हजर राहतील. बँकेमध्ये भाडे भरण्यासाठी पी.एम.जी.पी.च्या सर्व इमारतींच्या बाबतीत सदर प्रस्ताव तयार करण्यात आला

असून तो मुख्य लेखाधिकारी यांच्यमार्फत सादर करण्यात आला आहे. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी भाडेवसुलीकारांना अतिरिक्त कार्यभार देऊन पर्यायी व्यवस्था करण्यात आली असून बँकेमार्फत भाडे घेण्याचा प्रस्ताव विचाराधीन असून लवकरच त्यावर निर्णय घेण्यात येईल असे सांगितले.

मा. मुख्य अधिकारी यांनी बोटावाला चाळीच्या पुनर्विकासाबाबत ब-याच अडचणी असून त्यावर मार्ग काढयाच्यादृष्टीने प्रयत्न चालू आहेत. पुढील एक महिन्यात या प्रस्तावाबाबत निर्णय घेण्यात येईल असे सांगितले.

मा.सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी पी.एम.जी.पी.च्या ६६ इमारतींचा सर्वे करण्याकरिता कन्सलटन्ट ची नेमणूक करणार होते त्याबाबत काय झाले अशी विचारणा केली. यावर उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) यांनी त्या विभागातील ९ इमारतींचा सर्वे करण्याचे काम करण्यात आले असून टप्प्याटप्प्याने इतर इमारतींचे सर्वेक्षण करण्याचे प्रस्तावित असून त्याचा प्रस्ताव मुख्य अभियंता/प्राधिकरण यांचेकडे सादर करण्यात आला आहे असे सांगितले.

मा.सदस्य श्री जाधव यांनी पी.एम.जी.पी.च्या कोणत्या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करायचे व कोणत्या इमारतीची दुरुसती करावयाची हे ठरविण्याचे काम करण्यात येणार होते असे निदर्ईनास आणले. यावर मा.सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी पी.एम.जी.पी.च्या रहिवाशांना भरपूर त्रास होत आहे त्यामुळे या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी स्वतंत्र बैठक घेण्यात यावी असे सुचविले. मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, पी.एम.जी.पी.च्या इमारतींवर रु.१६कोटी खर्च झाल्यानंतर मंडळाची कायम स्वरुपी जबाबदारी संपुष्टात येईल परंतु तसे न झाल्यामुळे व पी.एम.जी.पी.च्या इमारतींची अवस्था खराब झाली आहे. त्यामुळे उमरखाडी येथील पी.एम.जी.पी.च्या ९ इमारतींचा पुनर्बांधणीचा पायलट प्रॉजेक्ट म्हणून घेण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. शासनाकडे सदर प्रस्ताव मंजूरीसाठी प्रलंबित आहे व त्याचा पाठपुरावा चालू आहे. पी.एम.जी.पी.च्या इमारतींवर अजून नवीन खर्च करावयाचा झाल्यास कोणत्या फंडातून करायचा हा प्रश्न आहे ? असा खर्च करता येत नाही. त्यासाठी पुन्हा फंड तयार करुन प्राधिकरणाकडे मंजूरी घ्यावी लागेल असे मा. सभापती यांनी सांगितले.

स्ट्रक्चरल ऑडीट केलेल्या इमारतींची काय स्थिती आहे ? आणि त्यांची जर दुरुस्ती होत नसेल तर त्यांच्या पुनर्बांधणीबाबत काय करता येईल ? स्ट्रक्चरल ऑडीटकरिता किती कालावधी लागेल अशी मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी विचारणा केली असता उपमख्य अभियंता (पुनर्रचना) यांनी १६ इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यासाठी कन्सलटन्टची नेमणूक करण्यात आल्या, ऑडीट करण्यासाठी एक महिन्याचा कालावधी लागेल व उर्वरित इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यासाठी कन्सलटन्टची नेमणूक करण्याचे प्रस्ताव मुख्य अभियंता /

प्राधिकरण यांच्याकडे पाठविण्यात येत असल्याचे सांगितले. त्यावर मा. सभापती यांनी लवकरात लवकर प्रस्ताव मुख्य अभियंता / प्राधिकरण यांच्या मंजूरी घ्यावी व सर्व इमारतींची परिस्थिती काय आहे त्याची माहिती होऊन प्रधान्यक्रमानुसार पुढील विकास क्लस्टर डेव्हलपमेंटच्या माध्यमातून किंवा कोणत्या अन्य मार्गाने करता येईल याबाबत निर्णय घेता येईल असे सांगितले.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी मोतीवाणी चाळीच्या पुनर्बांधणीचे टेंडर होऊन एक महिना झाला तरी अजूनही १०-११ भाडेकरु चाळीत रहात असल्यामुळे कामास सुरुवात करता आली नसल्याचे निदर्शनास आणले. त्यावर उपमुख्य अभियंता/ पुनर्रचना यांनी सदर भाडेकरुंना व्हेकेशन नोटीस देण्यात आल्या असून त्यांना जागा खाली करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यावर मा. सभापती यांनी ते भाडेकरु जर जागा खाली करीत नसतील तर पोलीसांच्या मदतीने त्यांच्या जागा खाली करण्यात याव्यात. सदर बाबतीत सहमुख्य अधिकारी यांनी उपमुख्य अभियंता/पुनर्रचना व उपमुख्य अधिकारी/सं.गा. यांच्यात कोऑर्डीनेशन करुन चाळीतील भाडेकरुंना संक्रमण शिबीरात पर्यायी जागा देऊन स्थलांतरित करण्याची कार्यवाही दि. २६ जाने. २००९ पूर्वी करण्याचे आदेश मा. सभापती महोदयांनी दिले.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी कुलाबा संक्रमण शिबीराच्या पुनर्विकासाबाबत काय अडचणी आहेत याबाबत विचारणा केली असता उपमुख्य अभियंता /सं.शि. यांनी माहिती दिली की, इ.क्र.२७, २८,३१ व ३२ या इमारती खाली करण्याची कार्यवाही चालू असून इ.क्र. २५,२६,२९,३० या इमारती तोडल्यानंतर काम सुरु होईल असे सांगितले. त्यावर मा. सभापती यांनी मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांना मा.मुख्यमंत्री महोदयांच्या यांचे हस्ते भुमिपूजनचा कार्यक्रम करण्यासाठी वेळ घेण्यास सांगितले व त्यानुसार उपमुख्य अभियंता/सं.शि. यांनी कार्यवाही करावी असे आदेश दिले.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी मागील बैठकीत मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी व्हेकेशन नोटीस महत्वाचा पुरावा असल्यामुळे पासपोर्टप्रमाणे व्हेकेशन नोटीस देण्याबाबत सूचना केली होती. त्याबाबत विचारणा केली. त्यावर मा. सभापती यांनी उपमुख्य अधिकारी / सं.शि. यांना व्हेकेशन नोटीसचा नमूना त्याप्रमाणे तयार करण्याच्या सूचना दिल्या.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी असे निदर्शनास आणले की, उपकरप्राप्त तसेच पुनर्रचित इमारतींवर म्हाडाची परवानगी न घेता मोबाईल कंपन्यांचे टॉवर, होर्डींग्ज उभारले जातात व याचा भार इमारतीवर पडतो तरी अशी परवानगी देण्यात येऊ नये. त्यावर सहमुख्य अधिकारी यांनी मा. मुख्य अधिकारी यांनी मा.आयुक्त, म.न.पा. यांना मुंबईतील उपकरप्राप्त इमारतींवर मोबाईल कंपन्यांचे टॉवर उभारण्यास परवानगी देण्यात येऊ नये पत्र दिल्याचे सांगितले. पुनर्रचित इमारतीवर होर्डींग्ज लावण्याबाबत मुंबई मंडळाने जसा प्रस्ताव करुन

परवानगी दिली जाते व त्यामुळे मंडळास निधी उपलब्ध होतो त्याप्रमाणे प्रस्ताव करावा असे मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी सुचविले. त्यावर मा.सभापती यांनी तसा प्रस्ताव सहमुख्य अधिकारी यांनी पुढील बैठकीत सादर करावा अशा सूचना दिल्या.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी एस.आर.ए. अंतर्गत दिलेलया संक्रमण गाळयांपैकी किती गाळे मंडळास परत मिळाले याबाबत विचारणा केली असता उपमुख्य अधिकारी/सं.गा. यांनी १८० गाळे परत मंडळास मिळाल्याची माहिती दिली.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी दादर, प्लाझा येथील आंकाक्षा इमारतीत १६ गाळे वर्षानुवर्षे खाली असल्याचे निदर्शनास आणले असता उपमुख्य अधिकारी / पुनर्रचना यांनी सदर गाळे पुनर्रचित इमारतीतील असून ते शाळेला वितरीत केलेले आहेत. व गाळे बंद ठेवल्याबद्दल शाळेला नोटीस देण्यात आली आहे अशी माहिती उपमुख्य अधिकारी/पु.गा. यांनी दिली. यावर मा. सभापती यांनी सदर गाळयांमध्ये कार्यालय करता येईल किंवा कसे याबाबत तपासणी करावी असे सुचविले

बैठकीच्या अखेरीस मा. सभापती यांनी सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर केले व पुढील बैठकी दि. ४ फेब्रु.२००९रोजी घेण्यात येईल असे जाहीर केले.

सचिव तथा निबंधक मुं.इ.दु.व पु. मंडळ

मुख्य अधिकारी, मुं.इ.दु.व पु.मंडळ

मा. सभापती, मुं.इ.दु.व पु.मंडळ